जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.

कल्पना कणापरी, ब्रह्मांडाचा भेद करी.®

# गुणवत्ता, पर्यावरण, व्यवसायविषयक आरोग्य व सुरक्षा धोरण

## जैन प्लास्टिक पार्क

आम्ही जैन प्लास्टिक पार्क येथे योग्य गुणवत्ता, पर्यावरण, व्यवसायविषयक आरोग्य व सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली व्दारे ग्राहकांचे संपुर्ण समाधन, उत्पादनांमध्ये उत्कृष्ट गुणवत्ता, बाजार पेठेत अग्रगण्यता, पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा तसेच आमच्या आवारातील सर्व सहकाऱ्यांच्या व इतर व्यक्तिंच्या व्यवसायविषयक आरोग्य व सुरक्षेसाठी प्रतिबध्द आहोत.

आम्ही आमची बांधिलकी खालील बाबींमधून निश्चित करू.

१. दर्जेदार उत्पादनांची निर्मीती आणि स्पर्धात्मक व वाजवी किंमतीत वेळापत्रकाप्रमाणे उत्पादनाचा पुरवठा, प्रतिष्ठापण व सेवा.

२. नैसर्गिक साधन संपत्ती जसे पाणी व लाकुड यांच्या जतनासाठी प्लास्टिक पाईप व सुक्ष्म सिंचन पध्दतीच्या पुरस्काराव्दारे जल व्यवस्थापन आणि वन संपत्तीच्या जतनासाठी बांधकाम, जाहिरात व इतर कारखान्यात प्लास्टिक शिटचा वापर.

३. सुक्ष्म सिंचन व तंतोतंत शेती पध्दतीच्या व उत्पादनांच्या पुरस्काराव्दारे साधनांचा योग्य वापर करून शेती मालाच्या उत्पादकतेत व गुणवत्तेत वाढ.

४. प्रदुषणास प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी उत्पादन प्रक्रियेतील निरूपयोगी पदार्थ निर्मीतीत घट, कच्चा माल व संलग्न साधन सामुग्रीचा उत्पादन करतांना योग्य तो वापर आणि उत्पादन प्रक्रियेतील आवाज व रजकणांचे प्रमाण कमी करणे.

५. इजा अथवा आजारास प्रतिबंध करण्यासाठी जोखीम मुल्यमापन, उचित प्रक्रिया, कृती व घटना तपास व विश्लेषण प्रणाली.

६. सर्व संबंधीतामध्ये गुणवत्ता, पर्यावरण संरक्षण, आरोग्य व सुरक्षा बाबत जागृतीसाठी प्रशिक्षण, दर्शके व इतर संपर्क साधनांचा वापर व कामगीरी मुल्यांकनाव्दारे सहभागाची प्राप्ती.

७. गुणवत्ता, पर्यावरण, व्यवसायविषयक आरोग्य व सुरक्षा करिता लागू असलेल्या गुणवत्ता, पर्यावरण घटक व व्यावसायविषयक आरोग्य व सुरक्षा घातका संबंधीत प्रचलित वैधानिक गरजा व इतर गरजांची पुर्तता.

८. आर्थिक दृष्ट्या टिकाऊ तंत्रज्ञानाचा स्विकार, उद्दीष्ट व ध्येयांची निश्चीती व समिक्षा आणि सर्व सहकाऱ्यांच्या सक्रीय सहभागाने गुणवत्ता, पर्यावरण, व्यवसायिक आरोग्य व सुरक्षा मध्ये सतत सुधार.

हे धोरण आमच्या कंपनीसाठी, कंपनीच्या वतीने अथवा नियंत्रणात काम करणाऱ्या सर्व व्यक्तिंना त्यांच्या वैयक्तिक कर्तव्या प्रति जाणिव असण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच मागणीनुसार सर्व संबंधीतांना व जनतेला उपलब्ध करून दिले जाईल.

दि. ०१ जानेवारी, २०१४

मंत्र संचालक

टिप : हे धोरण भारतातील सर्व जेआयएसएल ॲग्री इनपुट व प्लास्टिक उत्पादन प्रकल्पांना लागू आहे. उदा. जळगांव, हैद्राबाद, उदुमलपेठ, भावनगर, अलवर इत्यादी.



Live & Let Live
Lord Mahaveer